**लेखापरिक्षण योजना राबविण्यासाठी आवश्यक असणारी अस्थायी पदे सन २०२६-२७ या वर्षात पुढे चालू ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः अपदे-२७१७/प्र.क्र.०७/टेक्स-१(अ)**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२.

दिनांक : २८ एप्रिल, २०२६.

<u>वाचा</u>:-

१. स.प. व व. विभाग, शासन निर्णय क्र. राजस-१००३/प्र.क्र.४२/५-स/०३, दि.१२.०२.२००३.

२. स.प. व व. विभाग, शासन निर्णय क्र. राजस-१००५/प्र.क्र.१८१/५-स/०३, दि.३१.०१.२००६.

३. स. प. व व. विभाग, शासन निर्णय क्र. राजस-१००८/प्र.क्र.५३८/५-स, दि.०५.०५.२०११.

४. स.प.व व.विभाग, शासन निर्णय क्र. अपदे-२७१७/प्र.क्र.०७/टेक्स-१ (अ), दि.१३.१०.२०२५.

५. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.आस्था/कक्ष-१/सह सुत/मुदतवाढ/२०२६/३४२, दि.२३.०२.२०२६.

६. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र जा.क्र.आस्था/कक्ष-१/सह सुत/मुदतवाढ/२०२६/३५२, दि.२३.०२.२०२६.

७. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२८.०२.२०२६.

<u>प्रस्तावना</u> :-

विभागाच्या वाचा (३) येथील दिनांक ०५ मे, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये या विभागातील स्थायी व अस्थायी पदांच्या आढाव्यानुसार एकूण ९३१९ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मंजूरी देण्यात आली आहे. त्यामध्ये विभागातील लेखापरीक्षण कक्षासाठी ३९९५ पदांच्या आकृतीबंधास मंजूरी देण्यात आली आहे. संदर्भाधीन ४ येथील दि.१३.१०.२०२५.रोजीच्या शासन निर्णयांन्वये, आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर या कार्यालयात सहकारी सूतगिरण्यांसाठी निर्माण करण्यात आलेले विशेष लेखापरीक्षक वर्ग-१ (वेतनसंरचना-S-२०- रु.५६१००-१७७५००) या एका अस्थायी पदास तसेच सहकारी सूतगिरण्यांकरीता सतत व समवर्ती लेखापरीक्षण योजना राबविण्यासाठी आवश्यक असणारी २३ अस्थायी पदे दि.०१.०९.२०२५ ते दि.२८.०२.२०२६ पर्यंत चालू ठेवण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. आता त्यापुढे सदर योजनेतील अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

विभागाच्या दिनांक ०५ मे, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये, या विभागातील स्थायी व अस्थायी पदांच्या आढाव्यानुसार एकूण ९३१९ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मंजूरी देण्यात आली आहे. त्यामध्ये वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१, सहकारी संस्था (सूतगिरणी) या एक अस्थायी पदास तसेच वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या अधिनस्त असलेल्या कोल्हापूर, सांगली, सोलापूर व अमरावती या चार कार्यालयां मधील खालील तक्त्यात नमूद एकूण २३ अस्थायी पदांना दि.०१.०३.२०२६ ते दि.३१.०८.२०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पदाची वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | विशेष लेखापरिक्षक, वर्ग-१ | एस-२० : ५६१००-१७७५०० | ४ |
| २ | लेखापरिक्षक, श्रेणी-२ | एस-१३ : ३५४००-११२४०० | ६ |
| ३ | उपलेखापरिक्षक | एस-८ : २५५००-८११०० | ४ |
| ४ | कनिष्ठ लिपीक | एस-६ : १९९००-६३२०० | ६ |
| ५ | शिपाई | एस-१ : १५५००-४७६०० | ३ |
| | **एकूण पदे** | | **२३** |

**२.** आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर कार्यालयाच्या आस्थापनेवरील विशेष लेखापरिक्षक, वर्ग १, सहकारी संस्था (सूतगिरणी), या एका अस्थायी पदाचे वेतन व प्रवास भत्ता यावरील अपेक्षित खर्च मागणी क्रमांक व्ही-२, मुख्य लेखाशिर्ष २४२५-सहकार, ००१-संचालन व प्रशासन, (०१) (०४) हातमाग, यंत्रमाग व सहकारी वस्त्रनिर्माण यांचे आयुक्तालय (२४२५ ००५८) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सदर लेखाशिर्षाखाली मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

तसेच वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या अधिनस्त असलेल्या कोल्हापूर, सांगली, सोलापूर व अमरावती या चार कार्यालयां मधील एकूण २३ अस्थायी पदांचा येणारा खर्च मागणी क्र.व्ही-२, २४२५-सहकार, १०१- सहकारी संस्थाची लेखापरीक्षा, (०१) (०१)- लेखापरीक्षेसाठी कर्मचारी वर्ग (२४२५ ०२२७) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सदर लेखाशिर्षाखाली मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

**३.** सदर शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२८.०२.२०२६ अन्वये, अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२८१६५०२७०९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHITRA RAVINDRA BISEN

Digitally signed by CHITRA RAVINDRA BISEN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=F789A84DB3CD4420E2DB86C40DF943D84A7873BDE6B53430A5E3B150B091368E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=0BD6EA041CD6F49090B004C64DAAE9708BF029C76F9B139C454C2A8EA66C7EA3, cn=CHITRA RAVINDRA BISEN
Date: 2026.04.28 17:31:08 +05'30'

**(चित्रा बिसेन)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई /महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १, मुंबई/महाराष्ट्र २, नागपूर.
३. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. का.अ., ५-स, १२-स, १७-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
५. का.अ., व्यय-२/अर्थसंकल्प-१३, वित्तीय सुधारणा-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
६. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८. सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), पुणे.
९. विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सूतगिरण्या), सांगली/अमरावती/सोलापूर/इचलकरंजी.
१०. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सांगली/कोल्हापूर/सोलापूर/अमरावती.
११. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ३२ (२ प्रती).
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली/कोल्हापूर/सोलापूर/अमरावती.
१३. निवड नस्ती टेक्स-१ (अ) / टेक्स-१ (ब).